**एस.सी.सी.क्र. १८९/२१**
**शासन वि. मोहन**
**निशानी क्रं. १४**

सरकार पक्षातर्फे साक्षीदार क्र. १ ची जबानी द्वारे–
मी शपथेवर निवेदन करतो/करते की,
माझे नांव – यशवंत गोविंद कांबळे
वय – ४२ वर्षे, धंदा – शेती
राहणार – माकणी ता. लोहारा जि. उस्मानाबाद

सरतपास सरकारपक्षातर्फे विशेष सरकारी वकील श्री. बी.बी.ढेकणे यांच्यामार्फत –

१. मी आरोपीस ओळखतो. भागीरथी गोविंद कांबळे ही माझी आई आहे. दिनांक ३०/०१/२०२१ रोजी माझी आई संध्याकाळी ५.०० ते ६.०० वाजण्याच्या सुमारास शेताकडुन घराकडे येत होती. त्यावेळेस मोहन कदम याने माझ्या आईस मोटारसायकलने पाठीमागुन धडक दिली. माझे चुलते काशीनाथ कांबळे यांनी मला अपघाताबद्दल कळविले. त्यानंतर मी घटनास्थळी जाऊन माझ्या आईस उस्मानाबाद येथील नागर हॉस्पीटल येथे घेऊन गेलो. माझे चुलते यांनी मोहन कदम यांना थांबवुन चौकशी केली होती. उस्मानाबाद हुन माझ्या आईस दुस–या दिवशी रविवार कोठाडिया हॉस्पीटल, सोलापुर येथे पाठविले. उपचार चालु असताना माझा दिनांक ०१/०२/२०२१ रोजी जबाब घेतला. आता मला मला फिर्यादीजबाब दाखविण्यात आला. त्यावर माझी सही असुन त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी क्र. १५** देण्यात येते. आरोपीस पाहिल्यास ओळखु शकतो. तो आज न्यायालयात हजर आहे.

**उलटतपास आरोपीतर्फे विधीज्ञ श्री.डी.आर. पाटील यांच्यामार्फत** –

२. हे म्हणणे खरे आहे की, प्रत्यक्षात घटना काय घडली याबाबत मला माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझी आई वयोवृध्द आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझी आई शेतात जात असताना शेण गोळा करीत होती. साक्षीदार पुन्हा सांगतो की, माझी आई शेण गोळा करीत नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, माझी आई दुपारचा जेवणाचा डबा घेऊन जात होती. हे म्हणणे खरे नाही की, माझी आई डोक्यावर टोपले व हातात डबा घेऊन जात असताना तोल जाऊन पडली. हे म्हणणे खरे आहे की, माकणीहुन लोहारा कडे येत असताना माझी जमीन उजव्या बाजुला आहे. हे म्हणणे खरे आहे की, माकणी गाव झाल्यानंतर दोन शेत सोडुन तळे आहे. हे म्हणणे खरे आहे की, सकाळी ९ ते ११ व संध्याकाळी ४ ते ६ या वेळेत माकणी ते लोहारा रोडवर गर्दी असते. हे म्हणणे खरे नाही की, सदर रोड एकेरी आहे.

हे म्हणणे खरे आहे की, सदर रस्त्यावर दुभाजक नाही. हे म्हणणे खरे आहे की, दुभाजक नसल्यामुळे सदर रस्ता एकेरी दिसतो.

३. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या आईचे वय झाल्याने ती चालत येत असताना तोल जाऊन पडल्यामुळे तिला मार लागला. हे म्हणणे खरे नाही की, केवळ पैसे मिळावे म्हणुन आरोपीविरुध्द खोटी फिर्याद दिली आहे. मी विमा मिळण्यासाठी केस दाखल केली नाही. मी पोलिसांना जबाब दिला होता. हे म्हणणे खरे आहे की, दवाखान्याचा खर्च मिळावा असे मला वाटते. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे काही घडलेले नसताना खोटी फिर्याद दिली आहे. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी हे रेबे–चिंचोलीचे रहिवाशी असल्यामुळे त्यांना लोहारा येथे येण्यासाठी माकणी गावावरुन यावे लागते. हे म्हणणे खरे आहे की, माकणी या गावचा चहा प्रसिध्द आहे. हे म्हणणे खरे नाही की, चहा पित असताना माझे व आरोपीचे भांडण झाले होते. हे म्हणणे खरे नाही की, त्याचा मनात राग धरुन खोटी फिर्याद दिली आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सरतपासातील संपुर्ण मजकुर खोटा सांगितला आहे व आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास संपला. फेरतपास नाही.**

**माझे समक्ष व श्रवणोत्तर स्वीकृत**

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by SHYAM SHRINIVAS KALASKAR
Date: 2023.06.23 17:20:40 +0530

**( एस. एस. कळसकर )**

दिनांक –२३–०६–२०२३. **न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग लोहारा.**